नि. फौ. ख. क्र.२९२/२०२२
सरकार वि. प्रदीप वावगे + ०१
निशाणी क्र.२४

**<u>अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, मलकापुर, जिल्हा - बुलढाणा यांचे न्यायालयात</u>**
(पिठासीन अधिकारी : एस. एस. महाले)

**दोषारोप**

मी एस. एस. महाले, अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, मलकापुर, ता. मलकापुर, जिल्हा बुलढाणा तुमच्यावर

**१) प्रदीप समाधान वावगे,**
**वय – ३८ वर्षे, व्यवसाय- मजुरी,**

**२) गणेश समाधान वावगे,**
**वय – ४१ वर्षे, व्यवसाय- मजुरी,**
**आरोपी क्र. ०१ व ०२**
**राहणार- संत ज्ञानेश्वर नगर, मलकापुर,**
**तालुका-मलकापुर, जिल्हा बुलढाणा.**

खालीलप्रमाणे दोषारोप ठेवतो -

दि.०९/०३/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजताचे सुमारास या न्यायालयाचे स्थळसीमेत, एस.टी.बसस्थानक, मलकापुर येथे फिर्यादी नामे विजय मराजी बावणे यास तुम्ही आरोपी क्र.०१ व ०२ यांनी तुमचे समान उद्देशाचे पुर्नसरणार्थ पॉपकॉन विकण्याचे कारणावरून लोटपाट व चापटा-बुक्क्यांनी मारहाण करून त्याला इच्छापुर्वक दुखापत केली व त्याद्वारे तुम्ही आरोपींनी भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम **११५(२)** सह वाचनीय कलम **३(५)** अन्वये गुन्हा केला आहे.

दुसरे, त्याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी तुमचे समान उद्देशाचे पुर्नसरणार्थ वर नमुद कारणावरून तुमचेपैकी आरोपी क्र.०१ याने त्याचे हातातील लोखंडी स्टीलचे कड्याने फिर्यादीचे भुवईवर मारहाण करून त्याला इच्छापुर्वक दुखापत केली व त्याद्वारे तुम्ही आरोपींनी भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम **११८(१)** सह वाचनीय कलम **३(५)** अन्वये गुन्हा केला आहे.

तिसरे, त्याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी समान उद्देशाचे

पुर्नसरणार्थ वर नमुद फिर्यादीस, शिवीगाळ करून त्याला सार्वजनिक शांतता भंग करण्यास व गुन्हा करण्यास प्रोत्साहीत केले व त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम **३५२** सह वाचनीय कलम **३(५)** अन्वये गुन्हा केला आहे.

शेवटी, त्याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी तुमचे समान उद्देशाचे पुर्नसरणार्थ तुम्ही वर नमुद फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी देवून त्याचे मनात दहशत निर्माण केली व त्याद्वारे तुम्ही भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम **३५१** सह वाचनीय कलम **३(५)** अन्वये गुन्हा केला आहे.

आणि मी याद्वारे तुमच्याविरुध्द वरील गुन्ह्याकरीता खटला चालवण्याचे निर्देश देतो.

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2025.11.25 16:18:36 +0530

**स्थळ : मलकापुर,**
**दिनांक : २५-११-२०२५**

**( एस. एस. महाले )**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**मलकापुर**

**<u>-: प्रमाणपत्र :-</u>**

प्रमाणित करण्यात येते की, आरोपींना उपरोक्त दोषारोप मराठी भाषेत वाचून व समजावून सांगीतला.

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2025.11.25 16:18:41 +0530

**स्थळ : मलकापुर,**
**दिनांक : २५-११-२०२५**

**( एस. एस. महाले )**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**मलकापुर**